# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ : मुंबई विभाग

किरोल रोड, विद्याविहार [प], मुंबई - ४०० ०८६.

## -: जाहिरात :-

विभाग नियंत्रक, म. रा. मा.प. महामंडळ, मुंबई विभाग, किरोल रोड, विद्याविहार [पश्चिम] मुंबई ४०० ०८६. हे खाली नमुद केलेलया चालक [कनिष्ठ] , वाहक [कनिष्ठ], प्रमुख कारागिर [कनिष्ठ], कारागिर ''क'' [कनिष्ठ], सहाय्यक [कनिष्ठ] व सहाय्यक वाहतूक निरीक्षक [कनिष्ठ] या पदामधील रिक्त पदे भरण्याकरिता अधिकृत सेवायोजन कार्यालय / संस्थांमार्फत तसेच जाहिरातीव्दारे अर्ज मागविण्यांत येत आहेत.

सदर पदासाठी विहीत शैक्षणिक पात्रता, अर्हता तसेच शारिरीक पात्रता व अटी पूर्ण करणा-या पात्र उमेदवाराकडून सोबत देत असलेल्या विहीत नमुन्यांतील अर्ज **दिनांक १५.१२.२००९** पर्यन्त मागविण्यांत येत आहेत.

१) पदाचे नांव : चालक [ कनिष्ठ ]
भरावयाची एकुण पदे : २६१

### रिक्त पदे

| अ. क्र. | पदाचे नांव | अ.जा. | अ.ज. | वि. जा. व भ. ज. | | | | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अ | ब | क | ड | | | | |
| १) | चालक [कनिष्ठ] एकूण रिक्त पदे | ३४ | १८ | ८ | ९ | ७ | ५ | ५ | ५० | १२५ | २६१ |

१) चालक [कनिष्ठ ] वेतनश्रेणी :- रुपये २७९०-३८७० व वार्षिक वेतनवाढ ३% दराने मुळ वेतनावर

२) शैक्षणिक अर्हता :- अ) इ. १० +२+३ या अभ्यास क्रमातील इयत्ता १० [ एसएससी ] उत्तीर्ण.

ब) प्रादेशिक परिवहन अधिकारी [ आर.टी.ओ.] यांचेकडील अवजड वाहन चालविण्याचा मुदतीतील परवाना व पी.एस.व्ही. बॅज [बिलला] आवश्यक.

३) अनुभव व दाखला :- सर्व प्रकारची अवजड वहाने विशेषतः डिझेलवरील अवजड वाहन.[ ट्रक, प्रवासी बस ] चालविण्याचा निदान ३ ते ५ वर्षाचा विना-अपघात अनुभव असणे आवश्यक आहे.अवजड वाहन परवाना [ एच.जी.व्ही./ एच.पी.व्ही./ एच.टी.व्ही.] धारण केल्यापासुनचा पुढील ३ [तीन]. वर्षाचा अनुभव ग्राहय धरण्यांत येईल. त्या अगोदरचा अनुभवाचा दाखला ग्राहय धरला जाणार नाही.

अनुभवाचा दाखला रा.प.विहीत नमुन्यांतील असणे आवश्यक आहे.सदर नमुना दाखला सोबत देण्यांत येत आहे.

ड) मराठी भाषेचे लिहिण्या वाचण्याचे ज्ञान आवश्यक.

४) उंची :- उंची कमीत कमी १६० सेंमी.व जास्तीत जास्त १८० सेंमी.

५) दृष्टी :- चष्म्याविना ६ × ६[ चष्म्याविरहित दृष्टी]असणे आवश्यक.

६) वयोमर्यादा. :- दिनांक **१५.१२.२००९** रोजी उमेदवाराचे वय **२४ वर्षे पूर्ण व ३५ वर्षापेक्षा जास्त नसावे.**
मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथिल.
माजी सैनिकासाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे राहील.

२) पदाचे नांव : वाहक [ कनिष्ठ ]
भरावयाची एकुण पदे : २५१

## रिक्त पदे

| अ. क्र. | पदाचे नांव | अ.जा. | अ.ज. | वि. जा. व भ. ज. | | | | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अ | ब | क | ड | | | | |
| १) | वाहक [कनिष्ठ] एकूण रिक्त पदे | ३३ | १८ | ७ | ९ | ६ | ५ | ५ | ४८ | १२० | २५१ |

१) वाहक [कनिष्ठ ] वेतनश्रेणी :- रूपये २४४०-३३८४. व वार्षिक वेतनवाढ ३% दराने मुळ वेतनावर

२) शैक्षणिक अर्हता व अनुभव :- अ) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा [एसएससी]उत्तीर्ण (एसएससी गुणपत्रिका छायांकित प्रत अर्जासोबत स्वतंत्र लखोटयात जोडून त्यावर स्वतःचे नांव,प्रवर्ग [ SC,ST, VJ-A, NT-B, NT-C, NT-D, SBC, OBC, OPEN यापैकी जे लागू असेल ते नमूद करुन ] पदाचे नांव, नमुद करुन अर्जासोबत जोडावे)

ब) प्रादेशिक भाषेमध्ये लिहिता व वाचता आले पाहिजे.

क) प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडील बॅज [ बिल्ला व मुदतीतील परवाना आवश्यक. ]

३) उंची कमीत कमी १५८ से.ंमी. व जास्तीत जास्त १७८ सें.मी.

४) वयोमर्यादा दिनांक **१५.१२.२००९** रोजी किमान **१८ वर्षापेक्षा कमी व ३५ वर्षापेक्षा जास्त नसावे.** मागासवर्गीयांसाठी ५ वर्षासाठी शिथिलक्षम.
माजी सैनिकांसाठी कमाल ४५ वर्षे वयोमर्यादा राहील.

३) पदाचे नांव : प्रमुख कारागिर [ कनिष्ठ ]
भरावयाची एकुण पदे : ०२

**रिक्त पदे**

| अ. क्र. | पदाचे नांव | अ.जा. | अ.ज. | वि. जा. व भ. ज. | | | | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अ | ब | क | ड | | | | |
| १) | प्रमुख कारागिर [कनिष्ठ] | - | ०१ | | - | - | - | - | - | ०१ | ०२ |

१) प्रमुख कारागिर[यांत्रिक ] [कनिष्ठ ] वेतनश्रेणी **[ ०२ जागा ]** : रुपये ५७५०/- एकत्रित वेतन व रुपये १७३/- वार्षिक वेतनवाढ ५ [पांच ] वर्षे देण्यांत येईल. परंतु या कालावधीत इतर कोणतेही भत्ते दिले जाणार नाहीत. मात्र कर्मचा-यांच्या सवलती व रजा विहीत नियमाप्रमाणे मिळतील. या ५ [पांच ] वर्षातील कार्यक्षमता व गोपनीय अहवाल तपासून प्रमुख कारागिर पदाच्या वेतन श्रेणीत सामावुन घेण्याबाबत निर्णय घेण्यांत येईल.

२) शैक्षणिक अर्हता व अनुभव

अ) आय.टी.आय. उत्तीर्ण [संबंधित व्यवसायातील / ट्रेडमधील ] (आय.टी.आय. उत्तीर्ण गुणपत्रिका छायांकित प्रत अर्जासोबत स्वतंत्र लखोटयात जोडून त्यावर स्वतःचे नांव,प्रवर्ग [ SC,ST, VJ-A, NT-B, NT-C, NT-D, SBC, OBC, OPEN यापैकी जे लागू असेल ते नमूद करुन ] पदाचे नांव, व्यवसाय नमुद करुन अर्जासोबत जोडावे)
ब) दहा [१०] वर्षाचा संबंधित व्यवसायाचा व्यवसायीक अनुभव.
क) कामगारांवर नियंत्रण ठेवण्याची क्षमता.
ड) संबंधित व्यवसायाची चाचणी परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक.
इ) अवजड वाहन चालविण्याचा परवाना आवश्यक राहील.

३) वयोमर्यादा

दिनांक **१५.१२.२००९** रोजी किमान **१८ वर्षापेक्षा कमी व ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे.**

४) पदाचे नांव : कारागिर ''क'' [ कनिष्ठ ]
भरावयाची एकुण पदे : १६

## सर्वसाधारणपदे आरक्षणानुसार

| अ. क्र. | पदाचे नांव | अ. जा | अ. ज. | वि. जा. व भ. ज. | | | | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अ | ब | क | ड | | | | |
| १) | कारागिर ''क'' [कनिष्ठ] | ०१ | ०२ | १ | - | १ | - | - | ०३ | ०८ | १६ |

१) कारागिर ''क'' [कनिष्ठ ] वेतनश्रेणी : रुपये ५०५०/- :- एकत्रित वेतन व रुपये १५२/-- वार्षिक वेतनवाढ ५ [पांच ] वर्षे देण्यांत येईल. परंतु या कालावधीत इतर कोणतेही भत्ते दिले जाणार नाहीत. मात्र कर्मचा-यांच्या सवलती व रजा विहीत नियमाप्रमाणे मिळतील. या ५ [पांच ] वर्षातील कार्यक्षमता व गोपनीय अहवाल तपासून कारागिर ''क'' पदाच्या वेतन श्रेणीत सामावुन घेण्याबाबत निर्णय घेण्यांत येईल.

अ) शैक्षणिक अर्हता व अनुभव व्यवसाय - वीजतंत्री. **[ जागा ०३]**

१) संबंधित व्यवसायातील आय.टी.आय. [ इलेक्ट्रिशियन ] उत्तीर्ण आवश्यक. (आय.टी.आय. उत्तीर्ण गुणपत्रिका छायांकित प्रत अर्जासोबत स्वतंत्र लखोटयात जोडून त्यावर स्वतःचे नांव ,प्रवर्ग [ SC,ST, VJ-A, NT-B, NT-C, NT-D, SBC, OBC, OPEN यापैकी जे लागू असेल ते नमूद करुन ] पदाचे नांव, व्यवसाय नमुद करुन अर्जासोबत जोडावे)

२)संबंधित व्यवसायातील कामाचा ७ [सात ] वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव तारखेनिशी असणे आवश्यक.

३) संबंधित व्यवसायाची चाचणी परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक.

४)**वयोमर्यादा :-** दिनांक **१५.१२.२००९** रोजी **किमान १८ वर्षापेक्षा कमी व ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे.**
माजी सैनिकांसाठी कमाल ४५ वर्षे वयोमर्यादा राहील.

ब) शैक्षणिक अर्हता व अनुभव व्यवसाय - साठा जोडारी. **[ जागा ०२]**

१) शिटमेटल वर्कर व्यवसायातील आय.टी.आय. उतीर्ण आवश्यक. [आय.टी.आय. उत्तीर्ण गुणपत्रिका छायांकित प्रत अर्जासोबत स्वतंत्र लखोटयात जोडून त्यावर स्वतःचे नांव ,प्रवर्ग [ SC,ST, VJ-A, NT-B, NT-C, NT-D, SBC, OBC, OPEN यापैकी जे लागू असेल ते नमूद करुन ] पदाचे नांव, व्यवसाय नमुद करुन अर्जासोबत जोडावे.

२) शिटमेटल वर्कर व्यवसायातील कामाचा ७ [सात ] वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव तारखेनिशी असणे आवश्यक.

३) संबंधित व्यवसायाची चाचणी परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक.

४) **वयोमर्यादा** :-दिनांक **१५.१२.२००९** रोजी किमान **१८ वर्षापेक्षा कमी व ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे.**
माजी सैनिकांसाठी कमाल ४५ वर्षे वयोमर्यादा राहील.

क ) शैक्षणिक अर्हता व अनुभव
व्यवसाय - यांत्रिक .
**[ जागा ११]**

१) मोटार मेकॅनिक व्हेईकल व्यवसायातील आय.टी.आय. उत्तीर्ण आवश्यक. (आय.टी.आय. उत्तीर्ण गुणपत्रिका छायांकित प्रत अर्जासोबत स्वतंत्र लखोटयात जोडून त्यावर स्वतःचे नांव ,प्रवर्ग [ SC,ST, VJ-A, NT-B, NT-C, NT-D, SBC, OBC, OPEN यापैकी जे लागू असेल ते नमूद करुन ] पदाचे नांव, व्यवसाय नमुद करुन अर्जासोबत जोडावे)

२) अवजड वाहन चालविण्याचा परवाना आवश्यक.

३) मोटार मेकॅनिक व्हेईकल व्यवसायातील कामाचा ७ [सात ] वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव तारखेनिशी असणे आवश्यक.

४) संबंधित व्यवसायाची चाचणी परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक.

५) **वयोमर्यादा** :-दिनांक **१५.१२.२००९** रोजी किमान **१८ वर्षापेक्षा कमी व ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे.** माजी सैनिकांसाठी कमाल ४५ वर्षे वयोमर्यादा राहील.

५) पदाचे नांव : सहाय्यक [ कनिष्ठ ]
भरावयाची एकुण पदे : १७
[ सदर पदासाठी खालीलप्रमाणे ट्रेड व जागा आहेत.
मोटार मॅकेनिक -१० , शिट मेटल,-०५ ,
ऑटो इलेक्ट्रिशियन -०२ ]

## रिक्त पदे

| अ. क्र. | पदाचे नांव | अ.जा. | अ.ज. | वि. जा. व भ. ज. | | | | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अ | ब | क | ड | | | | |
| १) | सहाय्यक [कनिष्ठ] एकूण रिक्त पदे | १ | - | १ | - | २ | - | - | ४ | ९ | १७ |

सहाय्यक [कनिष्ठ ] वेतनश्रेणी ] : रुपये २४४०-३३८४ व वार्षिक वेतनवाढ ३% दराने मूळ वेतनावर .

२) शैक्षणिक अर्हता व अनुभव

अ) उमेदवाराने संबंधित व्यवसायातील औधोगिक प्रशिक्षण संस्थेचा कोर्स [ आय.टी.आय] यशस्वीरित्या पूर्ण केला पाहिजे . (आय.टी.आय. उत्तीर्ण गुणपत्रिका छायांकित प्रत अर्जासोबत स्वतंत्र लखोटयात जोडून त्यावर स्वतःचे नांव ,प्रवर्ग [ SC,ST, VJ-A, NT-B, NT-C, NT-D, SBC, OBC, OPEN यापैकी जे लागू असेल ते नमूद करुन ] पदाचे नांव, व्यवसाय नमुद करुन अर्जासोबत जोडावे)

ब) मोटार कारखान्यातील **३ [तीन ]** वर्षाचा अनुभव असल्यास विशेष पसंती .

३) वयोमर्यादा

दिनांक **१५.१२.२००९** रोजी किमान **१८ वर्षापेक्षा कमी व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे.** मागासवर्गीयासांठी ५ वर्षे शिथिलक्षम. माजी सैनिकांसाठी कमाल ४५ वर्षे वयोमर्यादा राहील.

६) पदाचे नांव : सहाय्यक वाहतूक निरीक्षक [ कनिष्ठ ]
भरावयाची एकुण पदे : ०२

## रिक्त पदे

| अ. क्र. | पदाचे नांव | अ.जा. | अ.ज. | वि. जा. व भ. ज. | | | | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अ | ब | क | ड | | | | |
| १) | सहाय्यक वाहतूक निरीक्षक [ कनिष्ठ ] | - | १ | - | - | - | - | - | - | १ | ०२ |

१) सहा.वाह.निरीक्षक [कनिष्ठ ] वेतनश्रेणी : रुपये ५०५०/- :- एकत्रित वेतन व रुपये १५२/-- वार्षिक वेतनवाढ ५ [पांच ] वर्षे देण्यांत येईल. परंतु या कालावधीत इतर कोणतेही भत्ते दिले जाणार नाहीत. मात्र कर्मचा-यांच्या सवलती व रजा विहीत नियमाप्रमाणे मिळतील. या ५ [पांच ] वर्षातील कार्यक्षमता व गोपनीय अहवाल तपासून सहा.वाह. निरीक्षक पदाच्या वेतन श्रेणीत सामावुन घेण्याबाबत निर्णय घेण्यांत येईल..

२) शैक्षणिक अर्हता व अनुभव
१) मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक. (पदवी गुणपत्रिका छायांकित प्रत अर्जासोबत स्वतंत्र लखोटयात जोडून त्यावर स्वतःचे नांव ,प्रवर्ग [ SC,ST, VJ-A, NT-B, NT-C, NT-D, SBC, OBC, OPEN यापैकी जे लागू असेल ते नमूद करुन ] पदाचे नांव, व्यवसाय नमुद करुन अर्जासोबत जोडावे)
२] वाहतूक व्यवस्थापन विषयक प्रमाणपत्र / पद्विका असल्यास प्राधान्य.

३) वयोमर्यादा
दिनांक **१५.१२.२००९** रोजी किमान **१८ वर्षापेक्षा कमी व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे.** मागासवर्गीयांसाठी ५ वर्षासाठी शिथिलक्षम.
माजी सैनिकांसाठी कमाल ४५ वर्षे वयोमर्यादा राहील.

४) शारिरीक पात्रता
१) उंची - १६३ सें.मी. [किमान ]
२)वजन - ४९ किलो ग्रॅम
३)छाती - ८४ से. मी. [ न फुगवता ]
महिला उमेदवारांसाठी उंची किमान १५३ सेंमी आवश्यक.

वरील सर्व पदांसाठीचा अर्जाचा नमुना सोबत देण्यांत येत असून पात्र उमेदवारांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे या कार्यालयास प्रत्यक्ष किंवा टपालाव्दारे **दिनांक १५.१२.२००९ रोजी १७.०० वाजेपर्यन्त** पोहचतील या बेताने पाठवावेत. नंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. चालक [ कनिष्ठ] पदासाठी अनुभवाचा दाखला [ Format ] सोबत देण्यांत येत आहे तो मालकाकडून भरुन आणावा.

उमेद्‌वारांनी सोबतच्या नमुन्यातील अर्ज २१ सें.मी. × ३२ सें.मी. आकाराच्या चांगल्या प्रतिच्या कागदावर स्वतः तयार करुन डीमांड ड्राफटसह / इंडियन पोस्टल ऑर्डर विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, किरोल रोड, विद्याविहार [पश्चिम ] मुंबई ४०० ०८६ या पत्त्यावर पाठवावा.

**महत्वाच्या सूचना :-**

१. अर्जातील अनुक्रमांक १ ते २० येथील समाईक माहिती सर्व पदांसाठी भरणे आवश्यक आहे. उमेदवार ज्या पदासाठी अर्ज करणार आहे, त्या पदासाठी जाहिरातीमध्ये नमुद केलेलया अर्हतेप्रमाणे अनुक्रमांक २१ ते २८ यापैकी लागू असलेली माहिती भरावयाची आहे.

२. रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार आणि आवश्यकतेनुसार नेमणुका करण्यांत येतील.

३. जाहिरातीमध्ये दिलेलया पदांची संख्या आणि राखीव पदे बदलण्यासापेक्ष आहेत.

४. अर्ज विहीत नमुन्यात सर्वदृष्टीने पूर्ण असावेत. अर्जाचा नमुना पुढे देण्यांत आला आहे. अपूर्ण माहिती दिली असल्यास किंवा आवश्यक ते प्रमाणित दाखले जोडले नसल्यास अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

५. शासकीय, निमशासकीय, शासकीय उपक्रम तसेच रा.प.महामंडळाच्यासेवेत असलेलया एखाद्या अर्जदाराला वर नमूद केलेल्या पदांकरीता अर्ज करावयाचा असेल, तर त्याने /तिने त्यांच्या / तिच्या खात्यामार्फत विहीत मुदतीत अर्ज सादर करणे आवश्यक आहे. [ रा.प, महामंडळातील कर्मचा-याची निवड व नेमणुक झाल्यास त्याचे रा.प. नियमानुसार वेतन संरक्षित करण्यात येईल ].

६. अलीकडच्या काळात काढलेले पारपत्र [ पासपोर्ट ] आकारातील स्वतःचे छायाचित्र स्वतःच्या स्वाक्षरीसह अर्जावर नमूद केलेल्या ठिकाणी चिकटवावे.

७. अर्जासाठी वापरण्यात येणारे कागद चांगल्या प्रतीचे [ छायांकित / झेरॉक्स प्रतीसाठी वापरण्यात येणारे ] २१ सेंटीमीटर × ३२ सेंटीमीटर आकाराचे असावेत.

८. पत्र व्यवहाराचा पत्ता आणि कायमस्वरुपी पत्ता सुस्पष्ट व पोष्टाच्या पिनकोडसह व्यवस्थित असावा.

९. उमेदवाराने अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला. शैक्षणिक अर्हतेच्या प्रमाणपत्र [सनद] शिकाऊ उमेदवारी, अवजड वाहन परवाना, प्रवासी वाहन बिल्ला , वाहक परवाना व बिल्ला, अनुभव, अपंगत्व, समांतर आरक्षणासंबंधी , उच्च उत्पन्न गटात मोडत नसल्याचा दाखला सन २००९-१० करीता वैध असावा. विशेष प्राधान्य गटात मोडत असल्याचे, शासकीय सेवेतील उमेदवाराने नियुक्ती प्राधिका-याचे ना हरकत प्रमाणपत्र, तसेच मागासवर्गीयांनी जाती प्रमाणपत्र व जाती प्रमाणपत्राच्या वैधता इत्यादी जे जे उमेदवारास लागू होते त्या

दाखल्याच्या साक्षांकित प्रती [ Attested copies ] जोडणे आवश्यक आहे. नॉन क्रिमीलेअर वैध दाखला न जोडल्यास उमेदवाराला आरक्षणाचा फायदा मिळणार नाही.

१०. उमेदवाराने स्वतः अथवा टपालाव्दारे अर्ज पाठवावा. टपालाव्दारे पाठविलेले अर्ज विहीत मुदतीत वर नमुद केलेल्या पत्त्यावर प्राप्त झाले नाहीत किंवा उशिरा प्राप्त झाले तर असे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. पोस्टाच्या विलंबामुळे कोणतीही माहिती प्राप्त होण्यास किंवा कळविण्यास विलंब झाला तर त्याची जबाबदारी रा.प. महामंडळावर राहणार नाही.

११. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती / प्रमाणपत्रे / कागदपत्रे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची / तिची उमेदवारी रद्द करण्यात येईल तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

१२. उमेदवाराने भरती प्रक्रिया शुल्क म्हणून रुपये १००/- खुल्या प्रवर्गासाठी व रुपये ५०/- मागासवर्गीयांसाठी **"M.S.R.T.Corporation Fund Account"**payable at Mumbai. यांचे नांवे काढलेला व मुंबई जिल्हास्तरावरील बॅंकेत अधिदानीत होणारा राष्ट्रीयकृत किंवा सहकारी बॅंकेचा [शेडयुल बॅंक] डिमांड ड्राफट किंवा रुपये १००/- व ५०/- भरती प्रक्रिया शुल्क इंडियन पोस्टल ऑर्डरव्दारे **"M.S.R.T.Corporation Fund Account"** यांचे

नांवे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे . भरतीप्रक्रिया शुल्क इतर कोणत्याही स्वरुपात स्विकारली जाणार नाही. डिमांड ड्राफट/ इंडियन पोस्टल ऑर्डरच्या मागे उमेदवाराने त्याचे नांव व पत्ता आणि पदाचे नांव ठळक अक्षरात लिहिणे अत्यंत आवश्यक आहे. उमेदवाराने पाठविलेले भरतीप्रक्रिया शुल्ककोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही.

१३. उमेदवारास एका पेक्षा जास्त पदांसाठी अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करणे व स्वतंत्र भरतीप्रक्रिया शुल्क भरणे आवश्यक आहे.[रु. १००/- रु.५०/- डिमांड ड्राफट / पोस्टल ऑर्डर ].

१४. विजा [अ] - भज [ब] - भज [क] भज [ड] या प्रवर्गाकरिता विहित केलेले आरक्षण त्या त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास अंतर्गत परिवर्तनीय आहे.

१५. अनु. जाती आणि अनु. जमाती प्रवर्गातील उमेदवार वगळता सामाजिक आरक्षणापैकी विजा व भज [ अ, ब, क, ड ] विशेष मागास प्रवर्ग आणि इमाव प्रवर्गातील उमेदवारांनी तसेच ३० टक्के महिला आरक्षणासाठी भज [क, ड] इमाव आणि खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांनी ते उन्नत आणि प्रगत गटात [नॉन क्रिमिलेअर ] मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिका-याचे नवीनतम प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. महिलांसाठी असलेले आरक्षण, शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग क्रमांक ८२ / २००१ / मसेआ - २०००/ प्रक्र ४१५ / का-२ दिनांक २५ मे २००१ व तद्नंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

१६. अनुसूचित जाती, विमुक्त जाती, विमुक्त भटक्या, विशेष मागासप्रवर्ग व इ. मा. व. उमेदवारांची नियुक्ती ही विहीत कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याच्या अधीन असेल.

१७. अनुसूचित जमातीच्या उमेदवारांनी त्यांच्या जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच त्यांना नेमणुक देण्यात येईल.

१८. तसेच रा.प. महामंडळाने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे / स्विकारणे इत्यादीचा अधिकार दिलेला नाही याची नोंद घ्यावी.

१९. जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमाचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तीची व्यवस्था केल्याचे

आढळल्यास त्याला / तिला भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यातून अथवा निवडीतून अपात्र ठरविण्यांत येईल.

२०. कोणताही अर्ज कोणतेही कारण न देता नाकारणे वा स्विकारणे किंवा सदर जाहिरात पूर्णतः वा अंशतः रद्द करण्याचे अधिकार महामंडळ राखून ठेवत आहे.

२१. उमेदवारांनी यापूर्वी केलेले अर्ज रदद करण्यात आलेले असून जाहिरातीप्रमाणे नवीन अर्ज सादर करावेत.

२२. शासनाच्या निर्णयानुसार महिलांसाठी ३०% ,माजी सैनिकासाठी १५% , प्रकल्पग्रस्त यांचेसाठी २% व भूकंपग्रस्त यांचेसाठी ३% प्रमाणे समांतर आरक्षण राहील.

२३. चालक [कनिष्ठ] पदाकरिता अनुभवाची अट विहीत केलेली आहे. सदर अनुभवाचा दाखला महामंडळाने विहीत केलेल्या व या जाहिराती सोबत दिलेल्या नमुन्यामध्येच पूर्णतः भरुन सादर करावा.

२४. उमेदवाराने सोबत देत असलेल्या नमुन्याप्रमाणे स्वतः अर्ज तयार करावयाचा आहे.

२५. सदरची भरती विशेषतः करुन मुंबई प्रदेशातील व गरजेनुसार इतर प्रदेशातील विभाग / घटकामध्ये गरज भासेल या तत्वावर तात्पुरत्या स्वरुपाच्या नेमणुकीसाठी करण्यांत येत असल्यामुळे जर उमेदवाराची निवड झाल्यास महाराष्ट्रात कोणत्याही विभागात नेमणुक देण्यांत येईल.

२६. प्रमुख कारागिर [कनिष्ठ] , कारागिर ''क'' [कनिष्ठ] व सहाय्यक [कनिष्ठ] या पदासाठी अर्ज करणा-या उमेवारांनी त्यांचा आय. टी. आय. चा ट्रेड [ व्यवसायाचा ] स्पष्टपणे अर्जावर उल्लेख करणे आवश्यक आहे.

**२७. रा.प. महामंडळाच्या सर्वच विभागामध्ये एकाच दिवशी वरील पदांच्या मुलाखती घेण्यांत येणार असल्याने उमेदवारांने एकाच विभागासाठी अर्ज करावा.**

२८. मागील भरतीच्यावेळी वाहक [कनिष्ठ] व सहाय्यक [कनिष्ठ] उमेदवारांच्या निवड झालेल्या जातीनिहाय शेवटच्या उमेदवाराला शैक्षणिक अर्हतेमध्ये मिळालेल्या गुणांची टक्केवारी खालीलप्रमाणे आहे.

| पद | अ.जा. | अ.ज. | विजा-अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वाहक [क] | ६९.३३ | ५३.७३ | ७०.१३ | ६४.८० | ६४.४२ | ७६.५७ | ६४.५३ | ६४.९३ | ६४.४६ |
| सहाय्यक [क] | ८०.५७ | ७५.७२ | ७४.७२ | ७६.१४ | ७९.५७ | - | - | ८० | ७८.८५ |

तरी वरील बाब विचारात घेऊन उमेदवारानी अर्ज करावेत.

२९. भरतीसाठी उपलब्ध असलेल्या सहाय्यक [कनिष्ठ] या प्रवर्गातील पदांपैकी ५० टक्के पदे ही सर्वसामान्य आय. टी. आय. प्रशिक्षित उमेदवारांसाठी आणि ५० टक्के पदे ही रा.प. महामंडळाच्या कार्यशाळेमध्ये शिकाऊ उमेदवारी पूर्ण केलेल्या आय. टी. आय. प्रमाणपत्र धारक फक्त ट्रेड ॲप्रेन्टिस उमेदवारांसाठी आरक्षित राहतील. पुरेसे शिकाऊ उमेदवार उपलब्ध न झाल्यास सर्वसामान्य आय. टी. आय. उमेदवारांमधून उर्वरीत जागा भरण्यांत येतील.

३०. सुशिक्षित बेरोजगारांना अर्थ सहाय्य या योजनेअंतर्गत शासकिय कार्यालयामध्ये २ वर्षापर्यन्त दरमहा मानधनावर काम केलेल्या रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर / पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना शासकिय / निम शासकिय सेवेतील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेवरील गट ''क'' पदावरील सरळसेवेने भरावयाच्या नियुक्त्यांसाठी १० टक्के समांतर आरक्षण शासनाने लागू केले असून त्यांना सध्याच्या ४५ वर्षे वयोमर्यादेमध्ये आणखी १ वर्षाने वाढ करुन सदर सवलत ४६ वर्षापर्यन्त देण्यांत आली आहे.

३१. शासन निर्णय क्रमांक एसटीसी -३४०४ / प्रक-३२ [भाग -१ ] परि-१ दिनांक ६.२.२००९ नुसार अपंगांना लागू केलेल्या आरक्षणाच्या धोरणानुसार Low vision ( L.V. ) व Partially Deaf ( P.D. ) अपंग प्रवर्गातील उमेद्वारांना चालक [कनिष्ठ] व वाहक [कनिष्ठ] पदांसाठी आरक्षण लागू राहणार नाही. मात्र सहाय्यक [कनिष्ठ], प्रमुख कारागिर [कनिष्ठ], करागिर ''क'' [कनिष्ठ] व सहाय्यक वाहतूक निरीक्षक [कनिष्ठ] या पदांसाठी अपंगांचे आरक्षण वरील प्रवर्गाकरीता लागू राहील.

***********

# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

## ...............................पदासाठी अर्ज.

(अर्जातील अनुक्रमांक १ ते २० येथील माहिती भरणे सर्व पदांसाठी आवश्यक आहे. उमेदवार ज्या पदासाठी अर्ज करणार आहे,त्या पदासाठी जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या अर्हतेप्रमाणे अनुक्रमांक २१ ते २८ यापैकी लागू असेल तेवढीच माहिती भरावयाची आहे. तसेच जेथे दाखला जोडावा असे नमुद केले आहे तेथे मूळ दाखल्याची प्रमाणित केलेली छायांकित प्रत जोडावी ).

प्रति
विभाग नियंत्रक,
रा. प. मुंबई विभाग,
विद्याविहार [प], मुंबई ८६.

अलिकडेच काढलेला
पासपोर्ट साईजचा
स्वतःचा फोटो
चिकटवून सही करणे.

माझी माहिती मी खालीलप्रमाणे सादर करीत आहे . . . .

| | | |
|---|---|---|
| १. | उमेदवाराचे संपूर्ण नांव [प्रथम आडनाव] | श्री/श्रीमती /कुमारी :. . . . . . . . . . . . . . . . |
| २. | वैवाहीक स्थिती | विवाहीत / अविवाहीत :. . . . . . . . . . . . . . . . |
| ३. | वडीलांचे पूर्ण नांव [पुरुष व अविवाहीत महिला उमेदवारांसाठी].<br>पतिचे नांव [विवाहीत महिला उमेदवारांसाठी ] | . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . |
| ४. | उमेदवाराचा सध्याचा पूर्ण पत्ता<br>[पत्र व्यवहारासाठी ] | . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .<br>. . . . . . . . . . . . . . पिन. . . . . . . . . . . |
| | उमेदवाराचा कायमस्वरुपी पत्ता<br>[कार्यालयीन दप्तरासाठी] | . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .<br>. . . . . . . . . . . . . . . . . . . . पिन. . . . . . |
| ५. | जन्म तारीख [शाळा सोडल्याचा दाखला जोडावा | तारीख. . . . . .महिना. . . . . . वर्ष. . . . . |
| ६. | अ) उमेदवाराचा जातीचा प्रवर्ग | मागासवर्ग / खुला |
| | ब) मागासवर्गीयांच्याबाबत उमेदवारांची जात<br>[दाखला जोडावा]. | अनु.जात/अनु.जमात/विजाभज (अ,ब,क,ड) /<br>विमाप्र / इमाव . . . . . पोट जात. . . . . . . . . |
| ७. | जातीचे वैधता प्रमाणपत्र [मागासवर्गीयांच्या बाबत ]<br>[असल्यास दाखला जोडावा] | आहे . . . . . . नाही . . . . . . . |
| ८. | उमेदवाराची मातृभाषा | . . . . . . . . . . . . . . . . . . . . . |
| ९. | शालेय व महाविद्यालयीन शिक्षणाचा तपशील [ सोबत दाखले जोडावे]. | |

| शाळेचे/बोर्डाचे/महाविद्यालयाचे/ विद्यापीठाचे नांव | उत्तीर्ण परिक्षा |
|---|---|
| | |
| | |

| | | |
|---|---|---|
| १० | शैक्षणिक अभ्यासक्रमाव्यतिरिक्त इतर क्षेत्रातील कार्य /<br>Extra Curricular Activities [दाखला जोडणे ]. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११अ | बॅंकेचे नांव | कोणाच्या नांवे काढले | डी.डी.क्रमांक व दिनांक | MICR No. | रक्कम रु. |
| | | M.S.R.T.Corporation Fund Account | | | |
| ११ब | INDIAN POSTAL ORDER | M.S.R.T.Corporation Fund Account | IPO NO. | - | |

| | |
|---|---|
| १२ | पूर्वीच्या नोकरीतील अनुभवाचा तपशील [चालक [कनिष्ठ] पदासाठी अर्ज करणा-या उमेदवारांनी मालकाच्या नावासोबत त्याचा पत्ता, दूरध्वनी क्र., चालविलेल्या वाहनाचा प्रकार व नोंदणी क्रमांक ,अनुभवाचा कालावधी पासून व पर्यन्त या दोन्ही तारखांसह इत्यादीचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे ] [दाखला जोडावा] |

| नियोक्त्याचे नांव | धारण केलेले पद | पासून | पर्यन्त | नोकरी सोडण्याची कारणे |
|---|---|---|---|---|
| | | | | |

| | | |
|---|---|---|
| १३ | उमेदवार अपंग असल्यास | अपंगत्वाचा प्रकार . . . . . . . . . . . . |

| | | |
|---|---|---|
| | [ विहीत नमुन्यातील दाखला जोडावा ] | अपंगत्वाची टक्केवारी . . . . . . . . . . |
| १४ | समांतर आरक्षणाच्या गटात मोडत असलयास गटाचा उल्लेख करावा. | महिला /माजी सैनिक/प्रकल्पग्रस्त/भूकंपगस्त यापैकी....... [माजी सैनिक/प्रकल्पग्रस्त/भूकंपगस्त यांनी दाखला जोडणे आवश्यक आहे]. |
| १५ | उच्च व प्रगत गटात मोडत नसल्याबाबत [ Non Creamy Layer] दाखला आहे काय ?<br>• सामाजिक आरक्षणासाठी विजाभज [अबकड] विमाप्र आणि इमाव या प्रवर्गासाठी लागू.<br>• महिला आरक्षणासाठी भज [क,ड], इमाव आणि खुला प्रवर्ग यांना लागू | असल्यास दाखल्याचा वैधता कालावधी लिहावा [दाखला जोडावा] |
| १६ | उमेदवारास पुढील विशेष प्राधान्य गटात मोडत असल्यास तो गट नमुद करावा / अधोरेखित करावा [दाखला जोडावा ] | • विद्यापीठ/राज्यस्तरीय किंवा त्यापेक्षा जास्त स्तरावरील खेळाडू [ दाखला जोडणे].<br>• विहीत अर्हतेपेक्षा जास्त शिक्षण.<br>• रा.प. महामंडळ बसने अपघातग्रस्त किंवा त्याचे नातेवाईक<br>• रा.प. महामंडळात शिकाऊ उमेदवारी केली आहे.<br>• सेवानिवृत्त कर्मचारी किंवा एक वर्षात सेवानिवृत्त होणारे कर्मचारी यांचा मुलगा / मुलगी. |
| १७ | उमेदवाराने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामध्ये कोणत्याही पदासाठी यापूर्वी किंवा आता दुस-या कोणत्याही पदासाठी अर्ज केला होता / आहे काय ? | मुलाखतीचे पद . . . . . . . . . . . . .<br>मुलाखतीचे ठिकाण . . . . . . .. . . . .<br>मुलाखतीचा दिनांक. . . .. . . . . . . . . .<br>निवड झाली अथवा नाही . . . . . . . . . . |
| १८ | उमेदवाराच्या कुटुंबातील कोणी व्यक्ति म.रा.मा.प.महामंडळात तात्पुरती /नियमित / मानसेवी नोकरीमध्ये आहे काय ? | नांव . . . . . . . . . . . . . . . . . .<br>पद. . . . . . . . ठिकाण. . . . . . . . .<br>रुजू दिनांक . . . . . . . . . . . . . . . . |
| १९ | उमेदवाराविरुध्द न्यायालयीन प्रकरण /पोलीस चौकशी प्रलंबित किंवा प्रस्तावित आहे काय ? तपशील द्यावा. | |
| २० | उमेदवार सध्या शासकीय सेवेत असल्यास नियुक्ती प्राधिका-याचे ''ना हरकत प्रमाणपत्र '' जोडावे. | शासकीय कार्यालयाचे नांव व पत्ता |

| | | |
|---|---|---|
| २१ | टंकलेखन तपशील [दाखला जोडावा ] | इंग्रजी. . . शब्द प्रतिमिनिट/मराठी . .शब्द प्रति मिनिट |
| २२ | लघुलेखन तपशील [दाखला जोडावा ] | इंग्रजी. . . शब्द प्रतिमिनिट/मराठी . .शब्द प्रति मिनिट |
| २३ | संगणकाचे ज्ञान आहे काय ?<br>MS CIT कोर्स केला आहे काय ? | होय / नाही<br>होय / नाही [असल्यास दाखला जोडावा] |
| २४ | अर्ज केलेल्या पदासाठी आवश्यक असे कोणतेही प्रशिक्षण मिळवले आहे काय? [दाखला जोडावा ] | संस्थेचे नांव . . . . . . . . . . . . . .<br>प्रशिक्षणाचा कालावधी . . . . . . . . . |
| २५ | चालक [कनिष्ठ ] पदासाठी अर्ज करणा-या उमेदवाराने द्यावयाचा तपशील | अवजड वाहन परवाना क्र. दिनांक. . . .<br>परवान्याची वैद्यता मुदत. . .[झेरॉक्स प्रत जोडावी]. |
| २६ | चालक [कनिष्ठ] पदासाठी अर्ज करणा-या उमेदवाराकडे सार्वजनिक वाहन चालविण्याचा बिल्ला आहे काय? | बिल्ला क्रमांक . . . . . दिनांक . . . . .<br>वैधता मुदत . . . . .[झेरॉक्स प्रत जोडावी] |
| २७ | वाहक पदासाठी अर्ज केला असल्यास | वाहकाचा परवाना व बिल्ला क्रमांक . . . . . दिनांक . . . . वैधता मुदत . . . . . . .[झेरॉक्स प्रत जोडावी] |
| २८ | उंची व वजन | ऊची . . . . सेटीमीटर/वजन. . . .कि.ग्रॅ. |

मी या अन्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो / करते की जाहिरातीमधील सूचना मी काळजीपूर्वक वाचल्या आहेत. तसेच अर्जामधील माहिती जाणीवपूर्वक व विश्वसपूर्वक दिली आहे व ती खरी आहे. यापैकी कोणतीही माहिती भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अथवा नेमणुक दिल्यानंतर खोटी असल्याचे आढळल्यास माझ अर्ज फेटाळून लावण्यास, माझी उमेदवारी रदद करण्यास किंवा सेवेतून कमी करण्यास आणि / किंवा अन्य कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन याची मी जाणीवपूर्वक नोंद घेतली आहे.

ठिकाण . . . . . .. . .

दिनांक . . . . . . . . . उमेदवाराची सही

**<u>** अनुक्रमांक १२ नुसार **</u>**

**<u>:- * चालक * पदासाठी आवश्यक असलेला अनुभवाचा दाखला -:</u>**

स्थळ :------------------------------ दिनांक :- ----------------------

## // दाखला //

१] मी श्री/श्रीमती ------------------------------------------------------------------------------

[ अवजड वाहन मालकाचे संपूर्ण नांव ]

मु.पो.:- ------------------- तालुका :- ------------------------- जिल्हा :- ------------------------
राज्य :- -------------------- पिनकोड नंबर ---------------------------- प्रमाणित करतो/करते की,

मी ----------------------------------------------------------------------------------------------

[ चालक उमेदवाराचे संपूर्ण नांव ]

राहणार :- ------------------------------- तालुका :- --------------------- जिल्हा :- -----------------
राज्य :- ---------------------------- पिनकोड नंबर ---------------------------- हे माझ्या स्वतःच्या मालकीच्या अवजड [ माल वाहतूक ट्रकवर] वाहन क्रमांक ----------------------------------------- मेक -------------- वर दिनांक ----------------------- पासून दिनांक ------------------------ पर्यन्त एकूण ------------------- वर्षे ---------------- महिने इतक्या कालावधीमध्ये सुरक्षित वाहन चालवुन, चालक म्हणुन काम करीत होते/आहेत त्याबाबतची माहिती खालीलप्रमाणे :-

२] १] अवजड वाहन चालविण्याचा परवाना :- --------------------------------------------------
लायसन्स क्रमांक व दिनांक.

२] परवाना नुतनीकरणाची तारीख :- ----------------------------------------

३] बॅच नंबर :- -------------------------------------------

४] माझ्याकडे काम करीत असलेलया कालावधीत त्यांचे हातुन झालेल्या अपघातासंबंधीचा तपशिल

अ] अपघात कधी झाला.

ब] अपघाताचे स्वरुप.

१] मरणांतिक :- --------------------

२] गंभीर :- -------------------------

३] किरकोळ :- ---------------------

क] अपघाताचे कारण :- -----------
-----------------------------------
-----------------------------------
-----------------------------------

ड] त्यांना अपघातासाठी जबाबदार धरण्यांत आले होते काय?

टिप :- अपघात झालेला नसेल तर असे स्पष्ट नमूद करावे.

३] माझ्याकडे चालकाचे काम करीत असतांना त्यांचेकडून कोणत्याही प्रकारच्या नैतिक अधःपतनाचा गुन्हा घडलेला नाही. तसेच त्यांस मद्यपानाचे वा अंमली पदार्थांचे सेवन करण्याचे कोणतेच व्यसन असल्याचे आढळून आलेले नाही.

[ असल्यास त्याप्रमाणे स्पष्ट नमूद करावे]

<u>पान क्रमांक :- २</u>

प्रमाणित करतो की, मी उपरोक्त माहिती, पडताळणी व शहानिशा करुन सदरच्या उमेदवाराचा प्रवासी वाहतूकीच्या सेवेत चालक पदासाठी अनुभवाचा दाखला देत आहे.

-------------------------------------------
[ उमेदवार स्वाक्षरी व तारीख ]

-------------------------------------------------
[अवजड वाहन मालकाची स्वाक्षरी व तारीख ]
[ट्रक मालकाने आपल्या नांवाचा/पेढीचा रबरी स्टॅम्प उमटविणे आवश्यक आहे]

४] <u>राजपत्रित अधिकारी/लोक प्रतिनिधींची शिफारस</u>

चालक पदासाठीचे वर नमूद केलेले उमेदवार व अवजड वाहन चालविण्याबाबत दाखला देणारे मालक या दोघांनाही मी स्वतः ओळखत असल्यामुळे सदरच्या अनुभव दाखल्यावर शिफारस देत आहे.

-------------------------------------------------
[राजपत्रित अधिकारी/लोक प्रतिनिधींची स्वाक्षरी व तारीख ]

-------------------------------------------------
[ नांव व हुद्‌दा ]

राहणार :- -------------------------------------
तालुका :- -------------------------------------
जिल्हा :- --------------------------------------

खासदार/आमदार/जिल्हा परिषद अध्यक्ष/जिल्हा परिषद सदस्य/नगरसेवक/सरपंच/ग्रामपंचायत सदस्य/राजपत्रित अधिकारी यापैकी कोणत्याही एकाची शिफारस चालेल